**नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रभावीत क्षेत्र (नैना) प्रकल्पासाठी सिडको महामंडळाच्या आस्थापनेवर महसूल अधिकारी व भूमि अभिलेख अधिकारी /कर्मचारी यांची नियमित पदे निर्माण करण्याबाबत.**

# महाराष्ट्र शासन

## नगर विकास विभाग

### शासन निर्णय क्रमांकः सिआयडी-३३२१/६०४/प्र.क्र.७३/नवि-१०

मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : १० एप्रिल, २०२३

**प्रस्तावना :**

नवी मुंबई प्रकल्पासाठी महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम ११३ अन्वये " नियोजन प्राधिकरण " म्हणून सिडको महामंडळाची स्थापना करण्यात आली आहे. नवी मुंबई प्रकल्पाच्या विकासाबरोबरच नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रकल्प, नवी मुंबई मेट्रो, नैना प्रकल्प इ. यासारख्या मोठ्या व महत्त्वाच्या प्रकल्पांच्या अंमलबजावणी व संनियंत्रणाची जबाबदारी सिडकोवर सोपविण्यात आली आहे. नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रभावीत क्षेत्र (नैना) च्या अंदाजे ४६४ चौ.कि.मी. क्षेत्रामध्ये ठाणे व रायगड जिल्हयातील गावांचा समावेश असून नैना क्षेत्राचे नियोजन व सुनियोजित विकासाची सिडकोकडे जबाबदारी आहे.

नैना प्रकल्पामध्ये मूळ जमीनधारकांची ६०% जमीन सार्वजनिक सुविधा विकसीत करण्यासाठी सिडकोकडे हस्तांतरीत करण्यात येत आहे. त्याबदल्यात संबंधीत जमीन मालकांना मूळ जमिनीच्या ४०% इतका विकसीत भूखंड मिळणार असल्याने जमीन मालकांच्या जमिनीच्या हक्कात बदल होणार असुन भूखंडाचे स्थान, क्षेत्र व नकाशा यामध्येही बदल होणार आहे. त्यामुळे जमीन मालकांचे हक्क बदल करून नोंदी ठेवणे, प्रॉपर्टी कार्डस तयार करणे, जमिनीची मोजणी करणे, नव्याने नकाशे तयार करणे इ. साठी महसूल व भूमि अभिलेख अधिकारी/कर्मचारी यांची आवश्यकता आहे. नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रभावित क्षेत्र (नैना) मध्ये सध्या कार्यरत महसूल विभागाचे अधिकारी यांचेकडे नैना क्षेत्राबाहेरील कामे असल्यामुळे ते नैना क्षेत्रासाठी पूर्णवेळ देऊ शकत नाहीत. त्यामुळे नैना क्षेत्रातील महसूल विभागाशी संबंधीत जमीन महसूल व भूमि अभिलेख संबंधीत कामकाज करण्यासाठी महसूल विभागाचे अधिकारी / कर्मचारी यांची नवीन पदे निर्माण करण्यास उच्चस्तरीय सचिव समितीच्या

Scanned with OKEN Scanner

दि.१३ डिसेंबर,२०२२ रोजी झालेल्या बैठकीत मान्यता प्राप्त झाली आहे. त्यानुसार सिडकोच्या नैना प्रकल्पासाठी महसूल अधिकारी व भूमि अभिलेख अधिकारी /कर्मचारी यांची पदे निर्माण करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय** :-

१) नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रभावित क्षेत्र (नैना) क्षेत्रातील महसूल विभागाशी संबंधीत जमीन महसूल व भूमी अभिलेख संबंधीत कामकाज करण्यासाठी महसूल विभागाकडून प्रतिनियुक्तीने नियमितपणे अधिकारी / कर्मचारी उपलब्ध होण्यासाठी नगर विकास विभागांतर्गत सिडकोच्या आस्थापनेवर खालीलप्रमाणे एकूण २२ नियमित पदे निर्माण करण्यास मंजूरी देण्यात येत आहे.

| **अ.क्र.** | **पदनाम** | **पद संख्या** | **वेतनश्रेणी** |
|---|---|---|---|
| १ | उप जिल्हाधिकारी | १ | एस-२० रु .५६१००-१७७५०० |
| २ | तहसिलदार | १ | एस-१९ रू.५५१००-१७५१०० |
| ३ | मंडळ अधिकारी | १ | एस-१२ रू. ३२०००-१०१६०० |
| ४ | तलाठी | २ | एस-८ रू.२५५००-८११०० |
| ५ | जिल्हा अधिक्षक भूमि अभिलेख | १ | एस-२० रू. ५६१००-१७७५०० |
| ६ | उप अधिक्षक भूमि अभिलेख | २ | एस-१५ रू. ४१८००-१३२३०० |
| ७ | शिरस्तेदार | २ | एस-१३ रू.३५४००-११२४०० |
| ८ | निमतादार | ४ | एस-६ रू.२५५००-८११०० |
| ९ | सर्व्हेअर | ८ | एस-६ रू.१९९००-६३२०० |
| | **एकुण** | २२ | |

२) नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रभावित क्षेत्र (नैना) अधिसूचित करण्यात आलेल्या असल्याने वर निर्माण करण्यात आलेल्या पदांचे कार्यक्षेत्र हे फक्त नैना प्रकल्प क्षेत्रातील महसूली गावांचे अधिकार क्षेत्रासाठी मर्यादित असेल. त्यास अनुसरुन संबंधीत अधिकारी / कर्मचारी यांना कामकाज करताना महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ तसेच महसूल आणि भूमी अभिलेख संदर्भातील कायदे / नियम याव्दारे प्रदान करण्यात आलेले अधिकार असतील. प्रचलित पध्दतीनुसार भूमी अभिलेख संबधीत कामकाजासंदर्भात नियंत्रण अधिकारी व अपिलीय अधिकारी हे उक्त कायद्याव्दारे विहीत केलेले अधिकारी असतील.

जिल्हा अधिक्षक भूमी अभिलेख, अलिबाग, जि.रायगड व उप अधिक्षक भूमी अभिलेख, पनवेल, जि. रायगड यांनी या पुढील आदेश होईपर्यंत नैना प्रकल्प क्षेत्रातील महसूली गावांचे कार्यक्षेत्र वगळून इतर क्षेत्राचे कामकाज नियमीतपणे पहावे.



Scanned with OKEN Scanner

३) नैना प्रकल्पासाठी नेमलेल्या अधिकारी / कर्मचारी यांचेवर व्यवस्थापकीय संचालक, सिडको यांचे प्रशासकीय नियंत्रण राहील. उपरोक्त पदांवरील नियुक्त्या नगर विकास विभागाच्या सहमतीने करण्यात याव्यात.

४) सदर सर्व पदांच्या वेतन व भत्त्यावरील तसेच त्यांच्या कार्यालयाचा अनुषंगिक खर्च सिडको महामंडळाकडून करण्यात येईल .

५) सदरचा शासन निर्णय महसुल व वन विभागाच्या तसेच वित्त विभागाच्या अनौ.सं. क्र. २०/ आ.पु.क./१३.०१.२०२३ अन्वये दिलेल्या मान्यतेस अनुसरून निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक २०२३०४१०१२५१२६२७२५ असा आहे. तसेच सदर शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

SHINDE SUBRAO NARAYAN

Digitally signed by SHINDE SUBRAO NARAYAN
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=GOVERNMENT OF MAHARASHTRA, 2.5.4.20=ffa7b5a27faed7560194e6272933cfa60dca1eb8ab54859ea e7920c9d0d1f622, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=E5BB5E62D0E131A274D92F7A1ACEF953E01301C1B 0FB615DC6CCE4812BDED257, cn=SHINDE SUBRAO NARAYAN
Date: 2023.04.10 16:25:00 +05'30'

**( सुबराव शिंदे )**
**सह सचिव, नगर विकास विभाग**

**प्रत,**

१. मा.राज्यपाल, महाराष्ट्र राज्य,यांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई
२. मा.मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव,मंत्रालय, मुंबई.
३. मा.उप मुख्यमंत्री यांचे खाजगी सचिव,मंत्रालय, मुंबई.
४. मा.अध्यक्ष, विधानसभा यांचे खाजगी सचिव, विधान भवन, मुंबई.
५. मा.उपसभापती, विधानपरिषद यांचे खाजगी सचिव, विधान भवन, मुंबई.
६. मा. विरोधी पक्षनेता, विधानसभा / विधानपरिषद .
७. सर्व विधानमंडळ सदस्य, विधानमंडळ, मुंबई
८. मा. उपाध्यक्ष, विधानसभा यांचे खाजगी सचिव, विधान भवन, मुंबई.
९. मा. विरोधी पक्षनेता, विधानसभा/ विधानपरिषद यांचे खाजगी सचिव, विधान भवन, मुंबई.
१०.मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई.
११.अपर मुख्य सचिव (नवि-१), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
१२.अपर मुख्य सचिव (महसूल) महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई.
१३.अपर मुख्य सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
१४.अपर मुख्य सचिव, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई
१५.व्यवस्थापकीय संचालक सिडको महामंडळ,नवी मुंबई



Scanned with OKEN Scanner

१६.विभागीय आयुक्त , कोकण विभाग, मुंबई

१७.जमाबंदी आयुक्त, पुणे

१८. जिल्हाधिकारी, ठाणे व रायगड

१९.महालेखापाल, (लेखा व अनुज्ञेयता)-१/२, मुंबई / नागपुर

२०.महालेखापाल, (लेखापरिक्षा)-१/२, मुंबई/ नागपुर

२१.संचालक व लेखा व कोषागारे,महाराष्ट्र राज्य मुंबई.

२२.निवासी लेखापरिक्षा अधिकारी, मुंबई

२३.अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.

२४.निवड नस्ती (नवि-१०).



Scanned with OKEN Scanner